**मुंबई मेट्रो मार्ग २अ आणि ७ च्या दैनंदिन प्रवासी संख्येत सलग तिसऱ्या दिवशी वाढ!**

**२६ जुलै रोजी मुंबई मेट्रो प्रवासी संख्येने गाठला उच्चांक**

**मुसळधार पावसात ही मुंबई मेट्रो प्रवाशांच्या सेवेत अविरत**

**मुंबई, २८ जुलै, २०२३:**

मागील दोन- तीन दिवसांपासून मुंबई शहरात आणि उपनगरात मुसळधार पावसामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला असून सर्वजणीक वाहतूक व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात ताण आला आहे. संततधार पावसात सुरक्षित आणि आरामदायक वाहतूक व्यवस्था म्हणून मुंबईकरांनी मुंबई मेट्रोला आपली पसंती दर्शविली आहे. त्यामुळे मागील तीन दिवसांपासून मुंबई मेट्रोच्या दैनंदिन प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यानुसार २४ जुलै २०२३ रोजी, २ लाख १२ हजार ४९०, २५ जुलै २०२३ रोजी २ लाख १८ हजार ६३५, तर २६ जुलै २०२३ रोजी सर्वाधिक म्हणजे २ लाख २२ हजार २९० इतकी दैनंदिन प्रवसंख्या नोंदवली गेली आहे. प्रवासी संख्येत वाढ होणे हे प्रवाशांचे मेट्रो वर असलेल्या विश्वासार्हतेच आणि कार्यक्षमतेच उदाहरण आहे.

मुंबईत गेल्या दोन - तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईच्या रस्त्यांवर तसेच सर्वत्र पाणी साचले, ज्याचा परिणाम हा सार्वजनिक तसेच खाजगी वाहतुकीवर त्यासोबतच नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर झाला. शिवाय मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. मात्र, विनाव्यत्यत सुरु असलेल्या मुंबई मेट्रो मुळे नागरिकांना बऱ्याच प्रमाणात दिलासा मिळताना दिसला.

मुसळधार पावसातही मुंबईकरांना अविरत सेवा पुरविणे हे स्थापित करण्यात आलेल्या मान्सून नियंत्रण कक्षाच्या उपाययोजनांमुळे शक्य झाले आहे. मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहत असताना देखील मुंबई मेट्रोने विना व्यत्यय १००% सेवा सुरु ठेवण्यात यशस्वी झाली असून नेहमीप्रमाणे दररोज २५३ सेवा चालवल्या गेल्या.

"मुंबईकरांनी मुसळधार पावसात सोईस्कर आणि पर्यावरणपूरक अशा मुंबई मेट्रोचा पर्याय निवडला याचा आम्हाला आनंद आहे. लोकांसमोरील येणारी आव्हाने आम्ही समजून घेतो आणि त्यांना त्रासमुक्त सेवा प्रदान करण्यासाठी आम्ही तत्पर आणि प्रयत्नशील आहोत. प्रवाशांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि अशा परिस्थितीत मुंबई मेट्रोची निवड केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो," असं महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से., म्हणाले.

**Mumbai Metro Lines 2A & 7 Witnesses Surge in Daily Ridership Amid Heavy Rainfall**

**Metro Ridership Continues to Soar for Third Consecutive Day**

**Mumbai Metro Maintains 100% Punctuality and Smooth Operations Amid Heavy Rainfall**

**Mumbai, July 28, 2023**

Despite facing heavy rainfall and subsequent disruptions in the city, Mumbaikars have chosen the Mumbai Metro as their preferred mode of transport for hassle-free and safe travel. The continuous rise in daily ridership over the past three days is a testament to the reliability and efficiency of Metro Lines 2A & 7.

The incessant rainfall in Mumbai over the last two days has resulted in waterlogging, affecting day-to-day functioning and causing cancellations of trains. Additionally, heavy rainfall has led to severe traffic congestion on the roads. However, commuters have opted for the Mumbai Metro, which has remained unaffected by the adverse weather conditions.

The daily ridership of the Mumbai Metro has witnessed a significant increase over the past three days. On July 24, 2023, the ridership reached 212,490, followed by 218,635 on July 25, 2023. The highest recorded ridership was on July 26, 2023, with 222,290 passengers. This surge in ridership has been observed specifically on the Metro 2A and 7 lines.

Despite the challenging weather conditions, the Mumbai Metro has successfully operated its 253 services daily, maintaining 100% punctuality without any disruptions. The smooth running of the Metro during heavy rainfall has been made possible by effective monsoon control measures.

The Mumbai Metro continues to serve as a reliable and convenient mode of transport for Mumbaikars, even in adverse weather conditions. The increase in daily ridership is a testament to the trust and confidence that the people of Mumbai have placed in the Metro system.

”We are delighted to see Mumbaikars choosing the sustainable and environmentally friendly option of the Mumbai Metro amid heavy rainfall. We understand the challenges faced by the people during this time and are committed to providing them with a hassle-free and sustainable mode of travel. We would like to express our gratitude to our commuters for their trust and for choosing the Mumbai Metro during such crucial times." stated Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA & CMD, MMMOCL.



